# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील ‘गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज’ येथील तीन वर्गखोल्यांच्या छताच्या दुरुस्तीबाबत

**(१) ४६६५ (२१-११-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील ‘गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज’ येथे तीन वर्गखोल्या गेल्या महिन्यापासून छताच्या दुरुस्तीअभावी बंद असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वर्गखोल्या दुरुस्तीसाठी बंद असल्याने दोन ते तीन सत्रात वर्ग भरविण्याची वेळ विद्यापीठावर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील ‘गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज’ येथे तीन वर्गखोल्यांच्या छतांच्या दुरुस्तीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०३-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

कलिना कॅम्पसमधील गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज इमारत ही तळ अधिक एक मजल्याची असून पहिल्या मजल्यावरील खोली क्र.४,५,६ मध्ये प्लॅस्टरला तडे गेले होते. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या वेळापत्रकामध्ये बदल न करता विद्यार्थ्यांच्या सोईनुसार दुरुस्ती करण्यात आली.

(२) वर्ग क्र. ५ आणि ६ च्या विद्यार्थ्यांच्या सोई प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने तसेच दोन सत्रात वर्ग घेऊन शिकवणी वर्ग घेण्यात आले.

(३) गरवारे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज इमारतीमधील दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांमधील 'पॅट (Periodic Assessment Test) परीक्षेतील गणिताच्या पेपर फुटीप्रकरणाबाबत

**(२) ४६९० (२१-११-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या 'पॅट' अर्थात *Periodic Assessment Test (PAT)* परीक्षेतील गणिताची प्रश्नपत्रिका आदल्या दिवशीच फुटली असून सदर परीक्षेच्या एक दिवस आधीच एका युट्युब वृत्तवाहिनीवर गणित विषयातील प्रश्न व त्यांच्या उत्तरांसंदर्भात माहिती प्रसारित करण्यात आली असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तसेच 'पॅट' परीक्षेतील गणिताचा पेपर फोडणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती प्रशासकीय अथवा दंडात्मक कारवाई केली आहे तसेच परीक्षेतील प्रश्नपत्रिका परीक्षे पुर्वीच इतर ठिकाणी वितरित होऊ नये (पेपेर फुटू नये) व विद्यार्थ्यांचा परिक्षेवरील विश्वास अबाधित राहावा यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत दिनांक १० ते १३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत संकलित चाचणी -१ (PAT -२ सुरु होताच एकूण तीन YOUTUBE CHANNEL वर भाषा, गणित या विषयाचे पेपर फुटल्याचे निदर्शनास आले. याबाबत संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच परीक्षेतील प्रश्नपत्रिका परीक्षे पुर्वीच इतर ठिकाणी वितरित होऊ नये (पेपर फुटू नये) व विद्यार्थ्यांचा परिक्षेवरील विश्वास अबाधित राहावा यासाठी, यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत ऑनलाईन बैठकीच्या माध्यमातून चाचणीचे योग्य नियोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात येते. तसेच, प्रत्येक चाचणीपूर्वी संबंधित सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा यांना लेखी सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोनखेडा (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथील साठवण तलावाच्या निकृष्ट कामाची चौकशी करण्याबाबत

**(३) ४९८८ (१४-११-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनखेडा (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथील सोनखेडा साठवण तलावाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, साठवण तलावाच्या बाजुने काढण्यात आलेला सांडवा योग्य रितीने काढण्यात न आल्यामुळे तलावामध्ये साठवणीपेक्षा जास्त पाणी जमा होऊन येथील शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनीमध्ये पाणी

साचल्याने संपूर्ण पीक बाधित झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त साठवण तलावाच्या कामाकरीता सोनखेडा येथील काही शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या परंतु सदर जमिनींचा मोबदला अद्यापही त्यांना देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त साठवण तलावाकरीता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या नव्हत्या त्यांच्यादेखील जमीनीत पाणी साचल्यामुळे त्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर साठवण तलावाच्या निकृष्ट कामाची सखोल चौकशी करुन चौकशीअंती दोषी असणाऱ्या ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०१-१२-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

सोनखेडा प्रकल्पाची घळभरणी मार्च २०२५ अखेर पूर्ण झाली असून सांडव्याचे कामही पूर्ण झाले आहे. सदरील तलाव माहे जून २०२५ मध्ये १००% पूर्ण भरल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने दिनांक ०८/०८/२०२५ रोजी कार्यकारी अभियंता यांनी तलावाची पाहणी केली असता गळती निदर्शनास आलेली नाही. करीता सदरील काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, असे म्हणणे योग्य नाही.

सदर प्रकल्पाच्या सांडव्याचे काम योग्य रितीने झालेले आहे. तथापि, सद्य:स्थितीत सदर प्रकल्प १००% भरला असून प्रकल्पासाठी संपादित क्षेत्राबाहेरील बाधित होणाऱ्या शेत जमिनीचे क्षेत्र संपादित करण्याच्या दृष्टीने खातरजमा करुन अतिरिक्त भूसंपादनाबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(२) होय.
(३) होय.
(४) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
नुकसान भरपाई बाबत प्रकल्पाकरीता संपादित क्षेत्राबाहेरील बाधित शेतीचे पंचनामे करण्यात आलेले असून नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव तयार करणे क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर असून मान्यता मिळताच नुकसान भरपाई अदा करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील गटसचिवांचे वेतन दीड वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(४) ५१४२ (२१-११-२०२५) डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २१४७८ ला दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थांकडून कामकाजासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या सुमारे २,५०० गटसचिवांचे वेतन दीड वर्षांपासून प्रलंबित असल्याने संबंधित

गटसचिवांना आर्थिक अडचणी, कर्जबाजारीपणा, सामाजिक समस्या, कुटुंबीयांचा उदरनिर्वाह आणि मुलांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,गटसचिवांचे वेतन थकीत राहण्यामागील मुख्य कारणे शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यास झालेला विलंब, संबंधित विभागांच्या आर्थिक नियोजनातील त्रुटी व इतर कारणे आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गटसचिवांचे गेल्या दीड वर्षापासून थकित असलेले वेतन वितरित करण्याबाबत निधीची आवश्यक ती तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच पुढील काळात गट सचिवांचे वेतन प्रलंबित राहणार नाही यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गटसचिवांचे वेतन अदा करण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित विविध कार्यकारी सहकारी संस्थेची आहे. गटसचिवांचे वेतन गटसचिव सेवा निधीतून देण्याची तरतूद आहे. शासन निर्णय दिनांक ०६/०९/२०१४ व दिनांक १६/११/२०२१ अन्वये विविध कार्यकारी सहकारी संस्थां सक्षमीकरण योजनेंतर्गत पात्र विकास संस्थांना प्रशासकीय खर्चापोटी आज अखेर रुपये २१२.३३ कोटी अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(३) राज्य शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सुधारणा करुन प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या सचिवांचा जिल्हा संवर्ग गठीत करण्यासाठी कलम ६९अ नव्याने समाविष्ट केले आहे. त्याबाबतची अधिसुचना दिनांक १८/०३/२०२४ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. दिनांक २३/०४/२०२५ रोजीच्या शासन अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम, २०२५ मध्ये नियम ५३अ व नियम ५३ब प्रसिध्द केले आहेत. नियम ५३ब मधील तरतुदीनुसार जिल्हा देखरेख सहकारी संस्थेमध्ये नामनिर्देशनाद्वारे अथवा सरळसेवेद्वारे नेमणुक करावयाच्या सचिवांची संख्या, त्यांची शैक्षणिक अर्हता व अनुभव, भरती व नामनिर्देशनाची कार्यपध्दती आणि सेवेच्या शर्ती बाबत मार्गदर्शक तत्वे विहित करण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. त्यानुसार शासन आदेश दिनांक ०५/०८/२०२५ अन्वये सचिवांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. तसेच सहकार आयुक्त कार्यालयाने त्यांच्या दिनांक १२/०८/२०२५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे शासन आदेश दिनांक ०५/०८/२०२५ च्या अंमलबजावणीबाबत सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद युडायस प्लस पोर्टलवर करण्याबाबत

**(५) ५१७६ (२५-११-२०२५) श्री.किरण सरनाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ.परिणय फुके, श्री.संजय केणेकर, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमित गोरखे, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.योगेश टिळेकर, श्री.सुनिल शिंदे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंद करण्यासाठी दिलेल्या युडायस प्लस पोर्टलवर वैध आधार कार्ड असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन संचमान्यता करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला असून, राज्यात विविध माध्यमांच्या शाळांतील एकूण २.४ कोटी विद्यार्थ्यांपैकी ९३.५१ टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून, ७ लाख ३७ हजार ४८५ विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण अवैध ठरले असून, ५ लाख २७ हजार विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्याचे तसेच ६३ हजार ९ विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची पडताळणी प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यात कुमारी मातेचे अपत्य, अनाथ बालके अशी जवळपास ९००० विद्यार्थी आहेत ज्याचे आधार कार्ड निघत नाहीत, युडायस प्लस पोर्टलवर ज्या विद्यार्थांचे आधारकार्ड काही कारणांमुळे वैध ठरणार नाहीत, असे विद्यार्थी शाळांमध्ये उपस्थित असूनही त्यांची नोंद पटसंख्येवर होणार नसल्यामुळे उक्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून त्याचा परिणाम शाळेची पटसंख्या कमी होऊन हजारो शिक्षक अतिरिक्त ठरण्याची भीती असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील अनेक शाळांचे अस्तित्व संकटात आले असून या निर्णयाविरोधात शिक्षक संघटना आक्रमक झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इ.१ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सरळ प्रणालीअंतर्गत नोंदणी करुन विविध योजनांचा लाभ देण्याकरीता आधार प्रमाणीकरण अनिवार्य असल्याने, विद्यार्थ्यांच्या आधार प्रणालीची माहिती युडायस प्लस प्रणालीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्यांना विविध परिक्षांच्या नोंदणी करताना अडचणी निर्माण होत आहेत, सदर विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्यासाठी तसेच आधार प्रमाणीकरण न झालेले विद्यार्थी शासनाच्या विविध योजनांच्या लाभांपासून वंचित राहू नये याकरीता शासनाकडून कोणती तात्पुरती अथवा पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे व त्याचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, राज्यातील एकूण शालेय विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप बाकी आहे, याचा तपशील काय आहे, तसेच राज्यातील आधारकार्ड नसलेल्या व वैध आधारकार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश पटसंख्येत करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे तसेच त्यासाठी शासनाने तातडीने सर्व विद्यार्थ्यांना आधार प्रमाणीकरण करण्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी पुरोगामी शिक्षक संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बालकांचे पाचव्या आणि पंधराव्या वर्षी आधार बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक असल्याने आधार प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य

सचिवांना विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्याकरीता विशेष मोहिम राबविण्याची सूचना केली असून त्यानुसार शालेय शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांच्या आधार पडताळणीसाठी राज्यभरात किती विशेष शिबिरे घेण्यात आली आहेत व आतापर्यंत किती विद्यार्थ्यांचे आधार बायोमेट्रिक अद्ययावत करण्यात आले आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील इ. १ ली ते इ. १२ वी पर्यंतच्या विविध माध्यमाच्या शाळांमधून सुमारे २ कोटी १२ लाख इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थ्यांपैकी ९४.९० टक्के इतक्या विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले असून प्रलंबित विद्यार्थी संख्या १०,९९,१४५ इतकी आहे.
(२) व (३) अनाथ बालकांना देखील आधार कार्ड देणेबाबत तरतूद करण्यात आली आहे. याकरीता संबंधित बालकाचे बाल संरक्षण गृहाचे अधीक्षक किंवा व्यवस्थापक यांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास आधार नोंदणी करणे शक्य आहे. आधार नोंदणी किंवा अद्ययावत न झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवण्यात येत नाही.
(४) व (५) राज्यातील इ. १ ली ते इ. १२ वी पर्यंतच्या विविध माध्यमाच्या शाळांमधून सुमारे २ कोटी १२ लाख इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थ्यांपैकी ९४.९० टक्के इतक्या विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले असून प्रलंबित विद्यार्थी संख्या १०,९९,१४५ इतकी आहे.

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) यांनी दिलेल्या सुचनांनुसार विद्यार्थ्यांच्या वयाच्या ५ व्या व पुन्हा १५ व्या वर्षी बायोमॅट्रीक अपडेट करणे बंधकारक असल्याने देशांतील सर्व शाळांना आधार अद्ययावत करणेसाठी आवाहन केले आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी अथवा इतर काही कारणास्तव त्रुटी असणाऱ्या आधार नोंदणीसाठी आधार प्राधिकरण यांच्या मदतीने राज्यात मोठ्या प्रमाणात शिबीरे आयोजित करण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटनांवर नियंत्रणासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीबाबत

**(६) ५२९७ (२१-११-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची प्रकरणे रोखण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे जुलै, २०२५ मध्ये शिक्षण संस्थांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर मार्गदर्शक तत्त्वांनुसार १०० हून अधिक विद्यार्थी असलेल्या प्रत्येक शिक्षण संस्थेत समुपदेशक, मानसशास्त्रज्ञ किंवा सामाजिक कार्यकर्ता नेमणे बंधनकारक करण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किती शिक्षण संस्थांनी या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले आहे आणि ज्या संस्थांनी त्याचे पालन केले नाही, त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीत झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-१२-२०२५) :** (१) होय.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २५/०७/२०२५ रोजीच्या मार्गदर्शक तत्त्वांनूसार खालील नमुद राज्यातील अकृषी विद्यापीठांनी खालील उपाय योजना केल्या अशी माहिती उपलब्ध झाली आहे--

**१. मुंबई विद्यापीठ** यांनी मा सर्वोच्च न्यायालयाच्या दिलेल्या आदेशामध्ये मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी सलंग्तिन महाविद्यालये व शैक्षणिक विभागासाठी परिपत्रक जारी केले आहे तसेच ऑनलाईन बैठका आयोजित केल्या आहेत. आवश्यक सूचना सर्व महाविद्यालयांना दिल्या आहेत.

**२. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर** यांनी एकत्रित मानासिक आरोग्य योजना अंतर्गत, मनोदर्पण संकल्पनेद्वारे राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधांत्मक योजना शिवाजी विद्यापीठ प्रवेशित विद्यार्थी/ विद्यार्थीनी यांच्याकरीता स्वंतत्र मानसिक समपुदेकाची नेमणूक आली आहे. इतर पुरक निर्देशांची विद्यापीठ कार्यक्षेत्राअंतर्गत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हायातील सर्व सलंग्नित महाविद्यालय स्तरावर अंमलबजावणी सुरू आहे.

**३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ** यांनी नोडल अधिकारी नियुक्ती केली आहे. संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्याना समन्वयक नेमण्याबाबत सुचनेनुसार बहूतांश महाविद्यालयांनी कार्यवाही केली आहे. सदर विद्यापीठाकडून मानसिक स्वास्थ व आत्महत्या प्रंबधनासाठी एक योजना तयार करण्यात आली

**४. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली** यांनी NTF च्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता विद्यापीठातील सर्व विभाग तसेच संलग्नित महाविद्यालयांना कळविले आहे. विद्यापीठात मेटल हेल्थ पॉलसी समितीचे गठन करण्यात आले असून समुपदेशक नियुक्ती प्रकियेची कार्यवाही सूरु आहे.

**५. कवि कुलगुरू संस्कृत विश्व विद्यालय रामटेक-** यांनी संलग्नित महाविद्यालयापैकी एकूण १२४ महाविद्यालयांनी संपर्क अधिकारी याची नेमणूक केली आहे. ऑनलाईन मिटिंग घेवून महाविद्यालयांना मार्गदर्शन केले आहे.

**६. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** यांनी नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. अंमलबजावणी अनुषंगाने ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली. मानसशास्त्र, कायदा, आरोग्य व जेडर स्टीडीज या क्षेत्रातील तज्ञ समावेश असलेली समिती स्थापन केली आहे.

**७. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** यांनी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालय यांचेमध्ये अंमलबजावणी प्रकिया चालू आहे.

राज्यातील इतरही अकृषी विद्यापीठांतर्गत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २५/०७/२०२५ रोजीच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणी संदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोपरा पुनर्वसन (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्गखोल्यांचे चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबत

**(७) ५४१३ (२१-११-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरा पुनर्वसन (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सर्व वर्ग खोल्यांचे चक्रीवादळामुळे छप्पर उडाल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना झाडाखाली बसून शिक्षण घ्यावे लागत असल्यामुळे एकूण ५ वर्ग खोल्यांचे नवीन बांधकाम करण्यासाठी तात्काळ निधीची तरतूद करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १७ मे, २०२५ रोजी झालेल्या चक्रीवादळामुळे शाळेच्या वर्गखोल्यांचे नुकसान झाल्याचा अहवाल तसेच पाच वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यासाठी निधी मिळावा या संदर्भातील प्रस्ताव जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत दिनांक १० सप्टेंबर, २०२५ रोजी पाठविण्यात आला असून, त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदन व प्रस्तावानुसार पाच वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) प्राथमिक शाळा कोपरा पु. शाळेतील वर्ग खोल्याचे छप्पर चक्रवादळामुळे उडाले हे खरे आहे.

निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही

(२) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत कोपरा पु. पंचायत समिती आर्वी वर्गखोल्याचे दुरूस्तीबाबतचा प्रस्तावात जिल्हा नियोजन अधिकारी वर्धा यांना सादर केला आहे त्यास मान्यता मिळाली आहे.

(३) मा.पालकमंत्री वर्धा यांनी सदर शाळा दुरूस्ती त्यांच्या प्रस्तावात समाविष्ठ केल्याने जिल्हा नियोजन अधिकारी वर्धा यांच्या दिनांक २५/०९/२०२५ रोजीच्या पत्रानुसार सदर शाळेच्या दूरूस्तीस अनुदान व प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया सुरू आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (जि.नाशिक) येथील उर्दू माध्यम शाळांमधील बोगस शिक्षक भरतीबाबत

**(८) ५४४४ (२१-११-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील स्थानिक उर्दू माध्यमाच्या हायस्कूलमध्ये १३ शिक्षक कार्यरत असल्याचे दाखवून त्यांच्या वेतनापोटी शासनाची सुमारे पावणे तीन कोटी रुपयांच्या शासन निधीचा अपहार केल्याचे माहे जुलै, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी देखील मालेगाव तालुक्यातील स्पेस हायस्कूल, सरदार प्राथमिक शाळा तसेच लोकमान्य हायस्कूल या शाळांमध्ये बोगस शिक्षक भरतीच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले असून वरील सर्व प्रकरणांमध्ये दोषी मुख्याध्यापक, लिपिक व शिक्षकांबरोबरच संबंधित संच मान्यता देणाऱ्या शिक्षण प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मालेगावमधील चारही बोगास शिक्षक भरती प्रकरणांमधील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

श्रीमती जैनब बाप मोहंमद, उपशिक्षिका, मालेगाव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, मालेगाव या दिनांक १७/०६/२०१३ पासून सेवेत कार्यरत असतानाही त्यांची सेवाज्येष्ठत्ता डावल्याने व इतर शिक्षकांना नियुक्ती दिल्याने श्रीम. जैनब यांनी पवारवाडी पोलीस ठाणे, मालेगाव, जि.नाशिक येथे गुन्हा क्र.१८१/२०२५ दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यात एकूण १३ शिक्षकांकडून मोठ्या प्रमाणात डोनेशन (देणगी) घेऊन सन २०१२ ते २०२१ या कालावधीत सदर संस्थेत उपशिक्षक म्हणून कार्यरत असल्याचे दाखवून, तसेच, त्यांच्या नेमणूकीचे बनावट कागदपत्रे तयार करुन व त्यास शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेऊन आणि त्यांच्या वेतनाचे रुपये २.६९ कोटी रुपयांचे थकीत देयक मंजूर करुन शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) मालेगाव, जि.नाशिक येथील उर्दू माध्यमाच्या शाळांमधून शासकीय निधीच्या अफरातफरीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासन पत्र, दिनांक २२/०५/२०२५ अन्वये आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु, संबंधित काही संस्थांनी, त्रयस्त व्यक्तीद्वारे करण्यात येत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येऊ नये, याकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.८८४९/२०२५,क्र.८८५०/२०२५, क्र.८८६०/२०२५ व क्र. ८९९६/२०२५ दाखल केल्या आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०३/०७/२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, शासन स्तरावर उपलब्ध अभिलेख्याच्या आधारे प्राथमिक चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी, आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली शासन पत्र दिनांक ०३/०७/२०२५ अन्वये समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १०/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राथमिक अहवाल सादर केला असून त्यानुसार विहित प्रक्रिया व अर्हतेचे पालन न करता नियुक्ती देणे, त्यास मान्यता देणे, पदभरतीस बंदी असताना नियुक्ती करणे व अशा नियुक्तींना मान्यता देणे, चुकीच्या मान्यतांमुळे शासनावर आर्थिक भार पडणे इत्यादी बाबतीत अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना शासन पत्र, दिनांक २९/१०/२०२५ अन्वये कळविले आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच, पवारवाडी पोलीस ठाणे, मालेगाव, जि.नाशिक येथील गुन्हा क्र.१८१/२०२५ मध्ये अटक करण्यात आलेले शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, अधीक्षक यांना शासन आदेश, दिनांक

२३/०९/२०२५ अन्वये निलंबित करण्यात आले असून, त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील माथाडी / मापाडी कामगार संख्येच्या नियमनाबाबत

**(९) ५५१५ (२१-११-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील माथाडी /मापाडी यांची संख्या निश्चित करण्याबाबत सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभागाकडून दिनांक १२ जून,२०१२ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार वार्षिक एक लाख क्विंटल शेतमाल आवकेस ०७ हमाल व ०३ मापाडी यांची कमाल संख्या निश्चित करण्याची अट आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अटीचा आधार घेऊन नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी सध्या कार्यरत कामगारांच्या संख्येपेक्षा दुप्पट कामगार भरती करण्याबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२५ मध्ये येवला, सटाणा व मालेगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी वाढीव माथाडी / मापाडी कामगार भरतीची वास्तविक आवश्यकता नसतानाही स्थानिक राजकीय दबावामुळे मा.जिल्हा उपनिबंधक यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून वाढीव भरती केल्यास सध्याच्या कामगारांच्या मासिक पगारात निम्याहून अधिक घट होऊन कामगार व त्यांच्या कुटुंबीय आर्थिक संकटात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वार्षिक एक लाख क्विंटल शेतमाल आवकेस ०७ हमाल व ०३ मापाडी अशी असलेली विद्यमान अट रद्द करून, नव्याने वर्षिक एक लाख क्विंटल आवकेस ०१ मापाडी व ०३ माथाडी अशी संख्या निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०८-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
नाशिक जिल्ह्यातील येवला,सटाणा व मालेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने वाढीव माथाडी/ मापाडी कामगार भरतीचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे सादर केला होता.
(३) अंशत: खरे आहे.

सन २०२५ मध्ये सटाणा व मालेगाव कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक या कार्यालयास सादर केलेले वाढीव माथाडी / मापाडी कामगार भरतीचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक या कार्यालयाने नाकारलेले आहेत. येवला कृषी उत्पन्न बाजार समितीने सादर केलेला मापाडी / माथाडी कामगार भरतीचे प्रस्ताव जिल्हा स्तरीय समितीने निर्णयानुसार

अशंतः मंजूर केलेला आहे.
(४) प्रस्तुत प्रकरणात जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने शासनास शिफारशीसह अहवाल सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील पीएच.डी. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शिकाअभावी प्रवेश नोंदणी प्रलंबित असल्याबाबत

**(१०) ५५५७ (२१-११-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर, श्री.संजय केणेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठातून गत दोन वर्षापूर्वीच पीएचडी करण्यासाठी आवश्यक पेट (PET) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश नोंदणीची मुदत माहे डिसेंबर, २०२५ मध्ये संपुष्टात येणार असल्याने पुन्हा परीक्षा देण्याची वेळ येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांची मार्गदर्शिकाअभावी अद्याप प्रवेश नोंदणी झाली नसून, मुंबई विद्यापीठाकडे गत दोन वर्षाच्या कालावधीत २१ प्राध्यापकांचे मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्याबाबतची विनंती अर्ज आले असूनही विद्यापीठाने सदर अर्जांना मान्यता दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या अनागोंदी कामकाजामुळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शिकाअभावी प्रवेश नोंदणी करता येणार नसल्याने विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊन शैक्षणिक नुकसान होणार असल्याने त्यांना पुन्हा नव्याने परीक्षा द्यावी लागणार असून सदरहू विद्यार्थ्यांना मार्गदर्शक न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन मुंबई विद्यापीठाने विद्यार्थ्यांना पीएचडी करण्यासाठी मार्गदर्शक प्राध्यापक देण्याबाबतच्या कामकाजात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) पीईटी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर परिक्षेत मिळालेले गुण व मुलाखतीच्या वेळी मिळालेले गुण हे एकत्रित करुन तसेच मार्गदर्शक (गाईड) आणि संशोधन केंद्रावरील पी.एच.डी. जागा यांच्या उपलब्धतेनुसार पीएचडीसाठी प्रवेश संबंधित संशोधन केंद्रावर दिले जातात. पी.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पी.एच.डी. प्रवेशाची सुनिश्चिती नसते व तसे पी.एच.डी. व्या नोटिफिकेशनवर स्पष्टपणे नमूद केलेले असते.

शैक्षणिक वर्षे २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये ६१३ इतके अतिरिक्त नवीन मार्गदर्शक विविध विषयांमध्ये मिळून उपलब्ध करुन देण्यात आले.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन नियमावलीनुसार नमूद केलेल्या २१ प्राध्यापकांसह अजून नवीन मार्गदर्शक उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सूरू आहे. नवीन मार्गदर्शकांना मान्यता मिळणे ही एक निरंतर सुरू असणारी प्रक्रिया असून ती पी एच.डी. प्रवेशाच्या सुनिश्चितीशी संबंधित नसते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील औषधनिर्माण शास्त्र संस्थांमधील अनियमितता आणि शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कार्यवाहीबाबत

**(११) ५५६० (२१-११-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशनच्या तपासणीत १२८ औषधनिर्माण शास्त्र संस्थामध्ये त्रुटी आढळून आल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शैक्षणिक संस्थामधील प्रवेश व शुल्कात पारदर्शकता आणण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून, उक्त प्राधिकरण समितीने १२८ संस्थांनी जर परिषदेच्या अनिवार्य अटीचे पालन केलेले नसेल तर अशा संस्थांचे शुल्क कमी करणे, खोटी माहिती दिल्याबद्दल दंडात्मक कारवाई व विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात आलेले अधिकचे पैसे परत करण्याबाबत तसेच वारंवार नियमाचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करणे आदीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने १२८ औषधनिर्माण शास्त्र संस्थामध्ये प्रवेश व शुल्कात पारदर्शकता आणण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाने संस्थांचे शुल्क कमी करणे, खोटी माहिती दिलयाबद्दल दंडात्मक कारवाई, व विद्यार्थ्याकडून वसुल करण्यात आलेले अधिकचे पैसे परत करण्याबाबत तसेच वारंवार नियमाचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०३-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ मध्ये मान्यता देण्यात आलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुषंगाने, सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि पदवी संस्थांची, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया ने निर्धारित केल्यानुसार शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे, यासंदर्भात अनुक्रमे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ आणि तंत्र शिक्षण संचालनालय यांच्यामार्फत फेरतपासणी करण्यात आली.
याबाबत, दिनांक २९/०७/२०२५ रोजी शासनस्तरावर बैठक होऊन, त्रुटी असलेल्या संस्थांकडून खुलासा घेण्याचे निर्देश देण्यात आले.

तपासणीमध्ये औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या ४८ पदवी आणि १२८ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांपैकी १८ औषधनिर्माणशास्त्र पदवी व ७१ औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याचे आढळून आले. या संस्थांची नावे शासनामार्फत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांना दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आली होती.

सदर पत्रास अनुसरून, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या अनुक्रमे ७१ व १८ संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष प्रवेश करण्यात येऊ नये, असे दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले.

तदनंतर काही संस्थांनी विभागाकडे पुनर्पडताळणीसाठी निवेदने सादर केली असता, पुनर्पडताळणीअंती ४२ संस्थांनी (३४ पदविका व ८ पदवी अभ्यासक्रम) त्रुटींची पूर्तता केल्याने सदर संस्थांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यात आले.

दरम्यानच्या कालावधीत उपरोक्त नमुद काही पदविका व पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केल्या होत्या. सदर न्यायालयीन प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक १३/१०/२०२५ रोजीचे आदेश विचारात घेऊन, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १६/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये यापूर्वीच्या त्यांच्या दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेले, १८ पदवी व ७१ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये प्रवेश न करण्याचे आदेश मागे घेऊन, सदर संस्थांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याबाबत कळविले.

औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची शिखर संस्था असलेल्या फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी संस्थांमध्ये प्रवेश न करण्याबाबतचे निर्देश मागे घेतले असल्यामुळे या संस्थांवर दंडात्मक कारवाई किंवा शुल्क कमी करणे अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील ‘एशियाटिक सोसायटी ग्रंथालयाला’ निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१२) ६०८९ (२६-११-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रतिष्ठित व ऐतिहासिक वारसा असलेल्या ‘एशियाटिक सोसायटी ग्रंथालयाची इमारत अत्यंत जीर्णावस्थेत असून, सदर इमारतीच्या छतातील फॉल्स सिलिंगचा काही भाग कोसळला असून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रंथालयाच्या संग्रहातील दुर्मिळ पुस्तके व हस्तलिखित यांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असून दीड लाखांहून अधिक पुस्तके हरविली आहेत तसेच, कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढ, वेतन थकबाकी, तात्पुरत्या कर्मचाऱ्यांच्या मानधनातील अनियमितता व मंजूर पदांवरील रिक्त

जागा भरण्याबाबत झालेल्या विलंबामुळे कामकाजावर परिणाम होत असल्याचेही त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एशियाटिक सोसायटी ग्रंथालयाच्या धोकादायक इमारतीची संरचनात्मक तपासणी (Structural Audit) करुन जिवीत हानी टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत, असल्यास, संबंधित अहवाल प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, एशियाटिक सोसायटी ग्रंथालयाच्या इमारतीची दुरुस्ती करुन ग्रंथालयाच्या उपरोक्त नमूद समस्या सोडविण्याकरीता शासनाने निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे तसेच, सदर ग्रंथालयास राष्ट्रीय महत्त्वाची संस्था म्हणून घोषित करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०८-१२-२०२५) :** (१) व (२) 'एशियाटिक सोसायटी कार्यरत असलेली नगर भवन या वास्तुचे देखभाल दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येते. सदर इमारतीच्या मंगलोरी कौलांमधून पाणी गळती होत असल्याने इमारतीच्या छतामधील आभासी छताचा (False Ceiling) काही भाग कोसळून पाणी गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे. पावसाळयात होणारी गळती वगळता संपूर्ण इमारत सुस्थितीत आहे यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्तीचे काम सुरु आहे.

सदर पाणी गळतीमुळे ग्रंथालयाच्या संग्रहातील दुर्मिळ पुस्तके व हस्तलिखित यांचे नुकसान झालेले नाही.

एशियाटीक सोसायटी ही स्वायत्त संस्था असून संस्थेतील कर्मचाऱ्यांची निवड, नियुक्ती तसेच तद्नुषंगिक बाबी तसेच ग्रंथालयीन व्यवस्थापनाचे अधिकार एशियाटीक सोसायटी, मुंबई संस्थेच्या कार्यकारी मंडळास आहेत.

सदर ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक पडताळणीमध्ये १,५०० पुस्तके गहाळ असून एशियाटीक सोसायटीमधील सर्व कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर २०२५ चे वेतन सदर संस्थेकडून देण्यात आले आहे. कोणतेही वेतन प्रलंबित नाही, असे एशियाटीक सोसायटी या संस्थेने कळविले आहे.
(३) व (४) सद्य:स्थितीत इमारत सुस्थितीत असून गळती होत असलेल्या भागाची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाहणी करण्यात आली असून आभासी छताचा (False Ceiling) खराब झालेला सर्व भाग काढून घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. आवश्यकतेनुसार सदर इमारतीचे संरचनात्मक परिक्षण करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत मंगलोरी कौलांची दुरुस्ती करणे व इतर स्थापत्य विषयक बाबींच्या एकूण ८ कामांस रुपये ३३६.९३ लक्ष एवढया रकमेस दिनांक १७/१०/२०२५ रोजी प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे. तसेच, अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी प्राप्त झालेली असून सदर कामांची निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.

एशियाटिक सोसायटी ग्रंथालयाला राष्ट्रीय महत्वाची संस्था म्हणून घोषित करण्याबाबत सदर संस्थेने केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून त्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## वरसई (ता.पेण, जि.रायगड) येथील बाळगंगा धरण प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१३) ६०९५ (२४-११-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरसई (ता.पेण, जि.रायगड) येथील बाळगंगा धरणाचे काम गेल्या १६ वर्षांपासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाचे काम पूर्ण न झाल्यामुळे संबंधित परिसरातील स्थानिक नागरिकांना पाणीटंचाई तसेच पिकांना पाणीपुरवठा न होण्यासारख्या अनेक अडचणी निर्माण होत असून प्रकल्पाच्या दीर्घकाळ विलंबामुळे प्रकल्प खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर अपुर्णवस्थेत असलेला प्रकल्प पूर्ण करण्यासाठी व वाढलेल्या खर्चाचे नियंत्रण व प्रकल्पाची गती वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने उक्त धरणाच्या कामासाठी आवश्यक निधीची तरतूद करून धरणाचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०८-१२-२०२५) :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

बाळगंगा प्रकल्प सिडको क्षेत्रात पाणीपुरवठा करण्याकरीता प्रस्तावित असून सदर प्रकल्पास सिंचन क्षेत्र नाही.

प्रकल्पाची अद्यावत सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमत रुपये २४०३.२७ कोटी आहे. प्रकल्प किंमतीत होणारी वाढ ही प्रामुख्याने भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा अधिनियम, २०१३ यामुळे व प्रलंबित न्यायालयीन प्रकरणामुळे प्रकल्प पूर्णत्वास विलंब होऊन प्रकल्प खर्चात वाढ होत आहे.

(३) बाळगंगा प्रकल्पाच्या रुपये २४०३.२७ कोटी रक्कमेच्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास सिडको संचालक मंडळाने दिनांक ०३/०३/२०२५ रोजी मान्यता दिली आहे. तसेच, बाळगंगा प्रकल्पाच्या सुधारित पुनर्वसन आराखड्यास (अंदाजित रक्कम रु १०८९.३४ कोटी) विभागीय आयुक्त, कोकण प्रदेश यांनी दिनांक १७/०७/२०२५ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

बाळगंगा प्रकल्पाचे उर्वरित भुसंपादन व पुनर्वसनाची कामे क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहेत. तसेच, सदर कामे निधी उपलब्धतेनुसार पुढील तीन वर्षात करण्याचे क्षेत्रिय स्तरावर नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोवेली पंचक्रोशी औद्योगिक वसाहत (जि.रत्नागिरी) येथील संस्थेच्या मनमानी कामकाजाबाबत

**(१४) ६२६३ (२४-११-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोवेली पंचक्रोशी औद्योगिक वसाहत, (जि.रत्नागिरी) या संस्थेचे अध्यक्ष व संचालक हे मनमानी

पध्दतीने कामकाज करत असून या संस्थेच्या कामकाजात सभासदांना विशेषतः आमसभेला बोलावले जात नसल्याचे तसेच संस्थेच्या नियमांनुसार निवडणुका न घेणे, व सभासदांकडून रोखीने पैसे वसूल करणे आणि प्लॉटचे मनमानी पध्दतीने वाटप करणे अशा स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे माहे, ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेच्या संचालक मंडळाने जुन्या सभासदांना दुर्लक्षित करुन नवीन सभासदांना प्लॉटची विक्री केली असून प्लॉट मनमानी पध्दतीने नवीन सभासदांना प्लॉट वितरीत केले असून संस्थेच्या संचालक मंडळाने शासनाच्या ‘२०-२०-६०’ योजनेंतर्गत अंदाजे २८ लाख रुपयांची आर्थिक अफरातफर करून शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यासंदर्भात दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे तसेच या संस्थेवर प्रशासक नेमणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०८-१२-२०२५) :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

सहकार अधिकारी, प्रथम श्रेणी, मंडणगड, जि.रत्नागिरी यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रश्नाधीन संस्थेची तपासणी केली असता, प्लॉट वाटपाची कार्यवाही संदिग्ध व मोघम असल्याचे निदर्शनास आले. तसेच, उद्योग विभागाच्या ‘२०-२०-६०’ योजनेंतर्गत संस्थेस प्राप्त झालेल्या शासन भागभांडवल रकमेच्या विनियोगाबाबत संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी संस्थेचे लेख्यांची नेमकी वस्तुस्थिती स्पष्ट केलेली नाही, असे प्रथमदर्शनी दिसून आले आहे.

(३) व (४) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, खेड यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ (३)(क) अनुसार आदेश दिनांक २७/११/२०२५ अन्वये संस्थेचे सन २०१२-२०१३ ते २०२४-२०२५ या कालावधीतील शासन अर्थसहाय्य/ भागभांडवल विनीयोग, प्लॉट वाटप व संस्थेने केलेले खर्च या बाबींच्या संबंधाने चाचणी लेखापरिक्षण करणेसाठी लेखापरिक्षक श्रेणी १, सहकारी संस्था (बलुतेदार), चिपळूण यांची नियुक्ती करून दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत अहवाल सादर करण्यास आदेशित केले आहे.

तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ (१) अन्वये सदर संस्थेच्या संचालक मंडळास पदावरून दूर करून प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

---

## शिवभूषण महाराष्ट्र शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेंतर्गत पात्र असलेल्या शेतकऱ्यांना सन २०१७ च्या कर्जमाफीतील प्रलंबित रकमेच्या वितरणात झालेल्या विलंबाबाबत

**(१५) ६२९० (२४-११-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१७ मध्ये जाहीर केलेल्या शिवभूषण महाराष्ट्र शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेंतर्गत पात्र असलेल्या अंदाजे ८ लाख ५८ हजार शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी अपेक्षित असलेल्या एकूण ५

हजार ८०० कोटी रुपयांपैकी आजतागायत संपूर्ण थकित रक्कम वितरित न झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, पात्र शेतकऱ्यांची पडताळणी, आधार खात्यांचे सिडिंग, बँकांमार्फत रकमेचे वितरण किंवा पोर्टलवरील तांत्रिक अडचणी इत्यादी कारणांमुळे दीर्घ काळापासून अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळालेला नाही, तसेच या विलंबामुळे शेतकरी वर्गावर बँकांकडून वसुलीसाठी दबाव येत असल्याने त्यांना पुनः कर्ज/पीककर्ज मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिवभूषण महाराष्ट्र शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेंतर्गत पात्र असलेल्या शेतकऱ्याना प्रलंबित रक्कम वितरित करण्यासाठी जिल्हा निहाय उर्वरित पात्र शेतकऱ्यांची अद्ययावत यादी तयार करून डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात निधी जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.बाबासाहेब पाटील (०८-१२-२०२५) :** (१) होय,

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ अंतर्गत पात्र ठरलेल्या उर्वरीत ६.५६ लाख शेतकऱ्यांना रुपये ५९७५.५१ कोटी रक्कमेचा लाभ देणे बाकी आहे.

(२) होय.

(३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७ अंतर्गत पात्र ठरलेल्या उर्वरीत ६.५६ लाख शेतकऱ्यांना रुपये ५९७५.५१ कोटी रक्कमेचा लाभ देण्यासाठी विभागाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्यातील अनेक जिल्ह्यांतील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेल्या मदतीच्या रकमेतून काही बँकांनी परस्पर कर्जवसुली केल्याबाबत

**(१६) ६३४७ (२६-११-२०२५) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये आलेल्या पुरानंतर शासनाने पूरग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा म्हणून आर्थिक मदत त्यांच्या बँक खात्यात जमा केली होती, सदर मदत पूर्णतः पुनर्वसन व अत्यावश्यक खर्चासाठी देण्यात आली होती. मात्र, काही राष्ट्रीयकृत तसेच खासगी बँकांनी संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेल्या या मदतीतून पूर्वीच्या थकबाकी कर्जाची परस्पर वसुली (adjustment / recovery) केली असून सदर पूरग्रस्तांना दिलेल्या मदतीचा मुख्य उद्देश त्यांच्या शेतकऱ्यांचे पुनर्वसनासाठी, कुटुंबाचा उदरनिर्वाह, बी-बियाणे खरेदी, शेतीची पुनर्बांधणी यांसारख्या तातडीच्या गरजांसाठी देण्यात आलेली रक्कमच बँकांनी कर्जाच्या परतफेडीसाठी वळविल्याने संबंधित कुटुंबांवर आर्थिक संकटाचा सामाना करावा लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेमुळे पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याऐवजी आर्थिक अडचणी वाढल्या असून बँकांच्या या कार्यपध्दतीमुळे शासनाच्या मदतकार्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेल्या मदतीच्या रकमेतून परस्पर कर्जवसुली करणाऱ्या संबंधित बँकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०८-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील पुरग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या शासकीय मदतीच्या रकमेतुन बँकांनी परस्पर कर्ज वसुली केल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, बँक ऑफ बडोदा, शाखा उमरी पेठ, ता.उमरी, जि.नांदेड या बँकेमध्ये ज्या शेतकऱ्यांनी त्यांचे आधार कार्ड थेट लाभ हस्तांतरणाकरीता (DBT) के.सी.सी. खात्याशी संलग्न केले होते त्यांची शासकीय मदतीची रक्कम के.सी.सी. खात्यात जमा झाली आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांचे आधार कार्ड बचत खात्याशी संलग्न होते त्या शेतकऱ्यांची शासकीय मदतीची रक्कम बचत खात्यामध्ये जमा झाली आहे. सदर प्रक्रिया पूर्णपणे आधार संलग्न DBT प्रणालीची स्वयंचलित कार्यपध्दती आहे. थेट लाभ हस्तांतरणाची रक्कम केसीसी तसेच बचत खात्यांमध्ये थेट जमा होणे हे संबंधित बँकेच्या शाखा व्यवस्थापकाच्या कोणत्याही वैयक्तीक निर्णयामुळे झालेली नाही. सदर प्रक्रिया ही स्वयंचलित स्वरुपाची आहे.
(२) व (३) शासन पत्र दिनांक ०७/११/२०२५ अन्वये राज्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी शासनामार्फत देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीचा उपयोग शेतकऱ्यांना होण्यासाठी या मदतीच्या रकमेतुन बँकांनी कर्जाची वसुली करु नये अशा सूचना सर्व बँकांना देण्याबाबत सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांना कळविले आहे. सदर सूचना सहकार आयुक्तालयाकडून दिनांक १७/११/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे सर्व बँकांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.

ज्या शेतकऱ्यांचे आधार कार्ड थेट लाभ हस्तांतरणाकरीता (DBT) के.सी.सी. खात्याशी संलग्न केले होते व शासकीय मदतीची रक्कम के.सी.सी. खात्यात जमा झाली आहे अशा शेतकऱ्यांनी बँकेकडे अर्ज केल्यानंतर बँकेमार्फत सदर रक्कम संबंधितांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सीसीआयच्या (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) कापूस खरेदी प्रक्रियेत विलंब होत असल्याबाबत

**(१७) ६३५८ (२६-११-२०२५) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कापूस खरेदीसंदर्भात सीसीआयने (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) दर निश्चित केले असले तरी, राज्यात कापूस खरेदी प्रक्रियेच्या अटींमधील बदलांमुळे जिल्हानिहाय ३ ते ५.६० क्विंटलपर्यंतच कापूस खरेदी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीसीआयच्या खरेदी केंद्रांवरील कठोर अटींमुळे शेतकऱ्यांना बाजारात कमी दराने कापूस विकावा लागत असल्याने त्याचा थेट आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत असून सीसीआयच्या खरेदीतील विलंब आणि खरेदी मर्यादेमुळे सन २०२५-२६ या हंगामात शेतकऱ्यांना सुमारे ४०० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळावा आणि सीसीआय खरेदी वेळेत व्हावी यासाठी केंद्र शासन व राज्य शासनामध्ये कोणता समन्वय प्रस्थापित करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, सीसीआय खरेदी प्रक्रियेमध्ये शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी, स्थानिक बाजार समित्यांमार्फत किंवा राज्यस्तरीय संस्थांमार्फत पूरक खरेदी व्यवस्था निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा शासनाचे कोणते नियोजन आहे वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०८-१२-२०२५) :** (१) भारतीय कपास निगम हे कृषी विभागाकडून प्राप्त कापसाची प्रति हेक्टरी जिल्हानिहाय सरासरी उत्पादकता, शेतकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ आणि कापूस लागवडीखालील क्षेत्र यावर आधारित कापूस खरेदी शेतकऱ्यांकडून करते. कृषी विभागाने जिल्हानिहाय सरासरी उत्पादकतेबद्दल सादर केलेली माहिती ‘‘कपास किसान’’ ॲपवरअपलोड करण्यात आली आहे. त्यानुसार भारतीय कपास निगम शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करत आहे.

शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष कापूस उत्पादन सरासरी उत्पादनापेक्षा जास्त असेल तर शेतकऱ्यांनी स्थानिक प्राधिकरणाकडून (महसूल किंवा कृषी अधिकारी) उत्पादनाचे प्रमाणपत्र घेवून ते भारतीय कपास निगम च्या खरेदी केंद्रावर सादर करावे अशा केंद्र शासनाच्या सूचना आहेत.
(२) हे खरे नाही.

तथापि, किमान आधारभूत किंमत दराने (एम.एस.पी.) कापूस खरेदी करण्यासाठी केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत भारतीय कपास निगम लि. ही नोडल संस्था आहे. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमत (एम.एस.पी.) मार्गदर्शक तत्त्वास अनुसरून भारतीय कपास निगम मार्फत शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करण्यात येतो.

कापूस हंगाम २०२५-२६ साठी भारतीय कापूस निगमने राज्यात किमान आधारभूत किंमतीने (MSP) कापूस खरेदीकरीता एकूण १६८ खरेदी केंद्रे उघडली आहेत. दिनांक ०३/१२/२०२५ पर्यंत, भारतीय कपास निगमने ९४,५३० शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किंमत (MSP) दराने १५,३४,६१२ क्विंटल कापूस खरेदी केला आहे.
(३) किमान आधारभूत किंमतीने कापूस खरेदीबाबत भारतीय कपास निगम लि. समवेत प्रत्येक सोमवारी नियमित आढावा बैठक घेण्यात येत आहे.
(४) राज्यात केंद्र शासनाचे मुख्य अभिकर्ता म्हणून भारतीय कपास निगम मार्फत राज्य शासनाच्या समन्वयाने कापूस खरेदी केली जात आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## ‘भावांतर योजना’ प्रभावीपणे अंमलात न आल्याबाबत

**(१८) ६३६१ (२४-११-२०२५) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारभाव शेतमालाच्या हमीभावापेक्षा कमी पडल्यास शेतकऱ्यांना थेट लाभ मिळावा या उद्देशाने ‘भावांतर भरपाई योजना’ राबविण्यात आली असून सदर योजना महाराष्ट्रात प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्याने सोयाबीन, मूग, हरभरा इत्यादी पीक उत्पादक शेतकऱ्यांचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यप्रदेशसारख्या राज्यांनी शेतमाल खरेदी केंद्रांशी थेट जोडलेल्या डिजिटल प्रणालीव्दारे भावांतर रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया अंमलात आली असताना, महाराष्ट्रात मात्र भावांतर देण्यात होणारा विलंब, नोंदणी प्रक्रियेतील क्लिष्टता, ‘सोपा’ ॲपमधील तांत्रिक अडचणी आणि शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर येत असलेल्या तक्रारी यामुळे सदर योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतमालाचा ‘बाजारभाव व हमीभाव’ यांतील थेट फरक भरून देणे हा या योजनेचा मूळ उद्देश असूनही अनेक वेळा भावांतर रक्कम प्रत्यक्ष वेळेत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने हजारो शेतकरी कर्जबाजारी होत असून शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भावांतर योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली, केंद्रावरच दर-पुष्टीकरण, २४ तासांत थेट खात्यात रक्कम वर्ग करणे तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांना स्पष्ट निर्देश देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

राज्यशासनाने शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा याकरीता केंद्र शासनाच्या किमान आधारभूत योजनेंतर्गत प्रभावीपणे हमीभाव खरेदी प्रक्रीया राबविली आहे. सद्य:स्थितीत राज्यामध्ये भावांतर भरपाई योजना राबविण्यात येत नसून किमान आधारभूत योजनेंतर्गत सोयाबीन, उडिद व मूग खरेदीसाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून नोंदणी व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून खरेदी प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. नाफेड/एनसीसीएफ यांच्यामार्फत दिनांक ०५ डिसेंबर, २०२५ अखेर ५५८ खरेदी केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहे

(२) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२५-२६ पासून शेतकऱ्यांची नोंदणी पॉस मशिन द्वारे करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांना त्यांची देयके ही प्रत्यक्ष लाभ हस्तांतरणाद्वारे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते.

किमान आधारभूत योजनेंतर्गत हमीभाव खरेदी प्रक्रीया प्रभावी पध्दतीने पार पाडण्यासाठी शासन स्तरावरून जिल्हाधिकारी तथा संबंधित अधिकाऱ्यांसह दर सोमवारी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. सदर बैठकीत आवश्यकतेनुसार संबंधितांना निर्देश देण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पेसा अनुसूचित क्षेत्र आणि बिगर पेसा अनुचित क्षेत्रातील कंत्राटी शिक्षकांचे प्रलंबित मानधन देण्याबाबत

**(१९) ६३८५ (२४-११-२०२५) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पेसा अनुसूचित क्षेत्र आणि बिगर पेसा अनुचित क्षेत्रातील कंत्राटी शिक्षकांचे मानधन देण्यासाठी एकूण ०३ कोटी ६० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय प्राथमिक शिक्षण विभागाने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित पेसा व बिगर पेसा क्षेत्रातील कंत्राटी शिक्षकांना थकित मानधन वेळेत मिळत नसल्याने या शेतकऱ्यांची आर्थिक कुंचबणा होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित पेसा व बिगर पेसा क्षेत्रातील कंत्राटी शिक्षकांना भविष्यात थकीत मानधन नियमितपणे वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील पेसा व नॉन पेसा क्षेत्रातील कार्यरत एकूण ३५०१ कंत्राटी शिक्षकांच्या थकीत मानधनाच्या अदायगी करीता रुपये ६१,५५,८४,०००/- (रुपये एकसष्ठ कोटी पंच्चावन्न लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतक्या रकमेची आवश्यकता असल्याने, सन २०२५-२६ मधील लेखाशीर्ष क्र.२२०२ ०१७३-१०, कंत्राटी सेवा या अंतर्गत मूळ अर्थसंकल्पीत रक्कम रुपये ७,५०,००,०००/- (रुपये सात कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी वित्त विभागाच्या मान्यतेने वितरित करण्यात आलेला आहे. तथापि, कंत्राटी शिक्षकांना मानधन देण्यासाठी रुपये ५४,०५,८४,०००/- (रुपये चोपन्न कोटी पाच लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) इतक्या अतिरिक्त तरतुदीची आवश्यकता असल्याने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात लेखाशीर्ष क्र.२२०२००४८-३१,२२०२३७०८-३१, २२०२०१८२-३१ व २२०२०२०८-३१ मधून रुपये २६,८८,९०,०००/- (रुपये सव्वीस कोटी अठ्ठयाऐंशी लाख नव्वद हजार फक्त) इतका निधी लेखाशीर्ष २२०२ ०१७३-१०, कंत्राटी सेवा या उद्दिष्टामध्ये शासन निर्णय दिनांक १५/१०/२०२५ अन्वये पुनर्विनियोजनाने उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

तसेच, सदर कंत्राटी शिक्षकांचे थकीत मानधन देण्यासाठी उर्वरित रुपये २७,१६,९४,०००/- (रुपये सत्तावीस कोटी सोळा लाख चौऱ्यान्नव हजार फक्त) इतकी रक्कम (५४,०५,८४,००० - २६,८८,९०,०००) पुरवणी मागणीने उपलब्ध करून देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आलेली आहे.

त्यामुळे सद्य:स्थितीत राज्यातील पेसा व नॉन पेसा क्षेत्रातील कंत्राटी शिक्षक मानधनापासून वंचित नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) येथील सेंट्रल उर्दू हायस्कूल या शाळेतील मुख्याध्यापकावर निलंबनाची कारवाई करण्याबाबत

**(२०) ६३८७ (२६-११-२०२५) श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) येथील सेंट्रल उर्दू हायस्कूल या शाळेतील मुख्याध्यापक यांनी विद्यार्थीनीला मारहाण करून विनयभंग केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकणी मुख्याध्यापक यांचेविरुध्द दिनांक २४ जुलै,२०२५ रोजी सावंतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्र.१३८/२०२५ दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हा नोंदवूनही संबंधित मुख्याध्यापकांविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली नाही तसेच संस्थेने दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी शिक्षणाधिकारी, माध्यमिक सिंधुदुर्ग यांच्याकडे शाळेतील मुख्याध्यापकांच्या निलंबनाच्या कारवाईसाठी परवानगी मागविली असतानाही अद्याप कोणतीही कारवाई केली नाही,तसेच शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनीही संबंधित मुख्याध्यापकावर निलंबनाची कारवाई करण्याबाबत दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ रोजी शिक्षणाधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी लेखी पत्र दिले असूनही अद्यापही सेंट्रल उर्दू हायस्कूल या शाळेतील मुख्याध्यापकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित मुख्याध्यापकावर पास्को (POCSO) कायद्यांतर्गत कारवाई करण्यास, व महाराष्ट्र खाजगी शाळांचे नियमन अधिनियम, १९७७ आणि नियम १९८१ च्या नियम ३३ अन्वये निलंबनाची परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) संबंधित मुख्याध्यापक यांचे विरूध्द सावंतवाडी पोलीस ठाणे येथे अल्पवयीन पिडीत फिर्यादी हीने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करणेत आला असून आरोपीस अटक करण्यात येऊन काही अटींच्या अधीन राहून जामिनावर सोडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मुख्याध्यापकावर महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. ३३ (५) नुसार कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी सदर शाळेच्या व्यवस्थापनाला कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.